# जाहिर नोटीस

*तमाम ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना कळविण्यांत येते की,*

*ज्या अर्थी, श्री. प्रदिप इंदुलकर यांनी श्रीनगर, वागळे इस्टेट परिसरातील अनधिकृत बांधकामाबाबत महापालिकेकडे तक्रारी करुन याबाबत खालील नमूद तक्रारींचा पाठपुरावा करीत आहेत.*

*१) श्रीनगर येथील कार्यालय आणि मागील नाल्यावर झालेल्या बांधकामाबाबत.*
*२) रमा माधव इमारती समोरील रिक्रेशिएशन ग्राऊंडवर होणारे पार्किंग.*
*३) आशिर्वाद बंगल्यात झालेले अनधिकृत बांधकाम.*
*४) श्रीनगर मार्केट (श्री मंगल कार्यालय) येथे उभारण्यात आलेले मंडप.*

*आणि ज्या अर्थी, सदर तक्रारीच्या अनुषंगाने जनसुनावणी घेण्यासाठी निम्न स्वाक्षरीकार यांना संदर्भ क्र. ठामपा/अति.आयुक्त (१)-१८७/२०१८, दि. ०४/०१/२०१८ अन्वये अधिकार प्रदान करण्यात आले आहेत आणि,*

*ज्या अर्थी तक्रारदार, जाब देणार तसेच वरील मुद्यांच्या अनुषंगाने परिसरातील नागरिकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी जनसुनावणी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.*

*त्या अर्थी, सर्व संबंधित नागरिक यांना उक्त तक्रारीच्या अनुषंगाने त्यांना म्हणणे मांडण्यासाठी निम्न लिखीत, विहित दिवशी, विहित वेळी आणि विहित ठिकाणी जनसुनावणीचे आयोजन केले असून, सदर जनसुनावणीसाठी उपस्थित राहून, योग्य त्या कागदपत्रांसह म्हणणे सादर करावे असे या जाहिर नोटीसीद्वारे सूचित करण्यांत येत आहे.*

| | | |
|---|---|---|
| *दिनांक* | *:-* | *२१ फेब्रुवारी, २०१८* |
| *वेळ* | *:-* | *सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वा. पर्यंत.* |
| *ठिकाण* | *:-* | *वागळे प्रभाग समिती कार्यालय, ठाणे महानगरपालिका, ठाणे.* |

*( ओमप्रकाश दिवटे )*
उप आयुक्त ( कर )
ठाणे महानगरपालिका, ठाणे

प्रत *:- माहितीसाठी सविनय सादर*

*१. मा. महापालिका आयुक्त सो.*
*२. मा. अतिरिक्त आयुक्त (१) व (२)*

प्रत *:-*

*१. उपआयुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, ठा.म.पा.*
   *- सुनावणीच्या अनुषंगाने आवश्यक ती पूर्वतयारी व योग्य तो समन्वयन साधण्यासाठी.*

*२. उपआयुक्त, परिमंडळ - २, ठा.म.पा.*
   *- यांजकडे उपस्थित राहणेसाठी.*

*३. सहाय्यक संचालक नगररचना, ठा.म.पा. यांना प्रतिनिधी उपस्थित ठेवणेसाठी.*

*४. विधी सल्लागार, विधी विभाग, ठा.म.पा. यांना उपस्थित राहणेसाठी.*

*५. माहिती व जनसंपर्क अधिकारी, ठा.म.पा.,*
   *- सदरचे जनसुनावणी जाहीर आवाहन ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांपर्यत वर्तमानपत्राद्वारे पोहोचविणेकरीता सदरचे आवाहन प्रसिध्द करावे. तसेच सदरचे जाहीर आवाहन ज्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यांत येईल त्याची प्रत या कार्यालयास पाठविण्यांत यावी.*

*६. मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, ठा.म.पा.,*
   *- सदर जाहीर सूचना महापालिका संकेतस्थळावरील मुख्य पानावर (Home page) प्रसिध्द करुन, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत इकडील कार्यालयास सादर करावा.*

*७. सहाय्यक आयुक्त, तथा पदनिर्देशित अधिकारी, वागळे प्रभाग समिती, ठा.म.पा.,*
   *- आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.*